भारत–सेवक

# गोपाल कृष्ण गोखले

☆

लेखक

अभिराम, पुणे

☆

किंमत बारा आणे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. ( टिळक )
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

नवीन सुधारलेली आवृत्ति

☆

जून १९५६

☆

सर्व हक्क स्वाधीन

# प्रास्ताविक

भारतावर इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाली ती केवळ ईशेच्छेनें झाली, त्या सत्तेपासून स्वदेशाचें अधिकांत अधिक हित करून कसें घेतां येईल याचा विचार करून त्याप्रमाणें निष्ठेनें कार्य करणाऱ्यांत ना. गो. कृ. गोखले यांचा क्रम बराच वरचा लागतो. त्यांच्या मार्गाबद्दल पुष्कळच मतभिन्नता त्यांच्या वेळींहि होती. परंतु मतभिन्नता असणें म्हणजे कांहीं देशद्रोह नव्हे व अप्रामाणिकपणाहि नव्हे. आजहि तशी मतभिन्नता पक्षोपपक्षांत आहेच. परंतु त्यामुळें भिन्नमतवाला पक्ष हा देशद्रोही व अप्रामाणिक ठरत नाहीं. निदान तसें कोणीं म्हणूं नये. प्रामाणिक मतभेद हे जीवन्तपणाचें लक्षण मानलें जावें.

गोखल्यांच्या काळांत जहाल व मवाळ असे दोन भेद पडले, परंतु त्याचें स्पष्टीकरण करतांना एकदां श्री. फेरोजशाह मेथा हे म्हणाले, "टिळकांचें राजकारणच आम्हांला झेपणारें नाहीं. त्यांनीं चळवळ करावी व तिचा फायदा आम्ही देशाच्या पदरांत पाडावा. आमचें उभयतांचें क्षेत्र बाह्यत: भिन्न असलें तरी त्याचें पर्यवसान देशहितांतच होतें. परंतु टिळकांप्रमाणें आमच्यानें कष्ट मात्र होणार नाहींत." यालाच म्हणतात निरोगी राजकारण.

ना. गोखल्यांनीं घटनाबद्ध पद्धतीचें राजकारण केलें, त्यांत त्यांना थोडें-फार यशहि मिळालें. देशांत जहाल मतप्रवाह वेगानें वाहूं लागावा व नोकरशाहीला त्याचें भयानक स्वरूप पटवून द्यावें, घटनाबद्धतेनें काम करणारांनीं ! अंतीं लाभ झाला तर तो देशाचाच. आणि ही गोष्ट टिळक व गोखले दोघेहि ओळखून होते. सामान्यजन इतक्या खोलांत न शिरतां बाहेरच्या स्वरूपांवरून टीका करण्यास प्रवृत्त होतो. त्यानें वस्तुस्थिति जाणावी या हेतूनें ना. गोखल्यांचें हें छोटें चरित्र वाचकांस सादर करीत आहे. तें वाचकांस रुचेल अशी अपेक्षा आहे.

अभिराम

पुणें १९।४।५६

# आयुष्यांतील ठळक गोष्टी

| | |
|---|---|
| जन्म | ९ मे १८६६. |
| कोल्हापुरांत आगमन | १८७५ |
| वडिलांचा मृत्यु. | १८७९ |
| प्रथम विवाह | १८८० |
| प्रवेश परीक्षा उत्तीर्ण | १८८१ |
| बी. ए. होतात | १८८४ |
| न्यू. ई. स्कूलमध्यें नोकरी | १८८४ |
| फर्ग्यूसन कॉलेजची स्थापना | १८८५ |
| डे. ए. सोसायटींत प्रवेश | १८८६ |
| द्वितीय विवाह | १८८७ |
| गोखले अंकगणित | १८८७ |
| कॉंग्रेस-प्रवेश | १८८९ |
| टिळक सोसायटी सोडतात | १८९० |
| सार्वजनिक सभेशीं संबंध | १८९० |
| मुंबई विद्यापीठांत | १८९५ |
| सा० सभेशीं संबंध सोडला | १८९६ |
| डेक्कन सभेची स्थापना | १८९६ |
| वेल्बी कमिशनपुढें साक्ष | १८९७ |
| प्लेग व माफी | १८९७ |
| प्रां. कायदेमंडळांत | १८९९ |
| पुणें म्यु० चे अध्यक्ष | १९०२ |
| डे. ए. सोसायटी सोडतात | १९०२ |
| वरिष्ठ कायदेमंडळांत | १९०२ |
| बनारस कॉंग्रेसचे अध्यक्ष | १९०५ |
| सर्व्हन्ट्स् ऑफ इंडिया सोसायटी स्थापना | १९०५ |
| प्राथमिक शिक्षणांचे ठराव | १९१०-११-१२. |
| मृत्यु | १९-२-१९१५ |